आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र दु १.३० वाजता

२ मे २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस, श्रीकांत शिंदे, हेमंत गोडसे, भारती पवार आज अर्ज भरणार

- निवडणूक प्रचारात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप

- इंडिया आघाडीमध्ये प्रधानमंत्रीपदाबाबत चर्चा झाली नसल्याचा शरद पवार यांचा दावा, राहुल गांधीच प्रधानमंत्री होतील असं नाना पटोले यांचं मत

**आणि**

- ग्रँडमास्टर सन्मान मिळवणारी वैशाली आणि आर. प्रज्ञानंद ही जगातली पहिली भावा-बहिणीची जोडी

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातल्या अर्ज भरण्याची मुदत उद्या संपणार आहे. त्यामुळं अर्ज भरण्याची लगबग उमेदवारांमध्ये सुरू आहे. अर्ज भरण्यासाठी कल्याणमध्ये शिवसेनेचे उमेदवार श्रीकांत शिंदे यांनी मोठी रॅली काढली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक नेते, कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

नाशिकमध्ये शिवसेनेचे हेमंत गोडसे आणि दिंडोरीतून भाजपाच्या भारती पवार आज अर्ज भरणार आहेत. त्यांच्या मिरवणुकीला लवकरच सुरुवात होईल.

<><><><>

आगामी लोकसभा निवडणुकीत पराभव होईल, या भीतीनं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी काँग्रेसबद्धलच्या अफवा पसरवत आहेत, असा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला. काँग्रेस महिलांची मंगळसूत्र काढून घेईल आणि जनतेची घरं हिरावून घेईल, असे दावे करून ते जनतेची दिशाभूल करत असल्याचं असं राहुल गांधी म्हणाले.

<><><><>

इंडिया आघाडीमध्ये प्रधानमंत्री पदाबाबत अजून चर्चा झालेली नाही. पुरेसं संख्याबळ आल्यावर निर्णय घेतला जाईल. त्यामुळं इंडिया आघाडी अस्थिर सरकार देईल असा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा दावा चुकीचा असल्याचं शरद पवार यांनी कोल्हापुरातल्या पत्रकार परिषदेत आज सांगितलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वर्तवणुकीवरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. तरुणांचाही त्यांच्यापेक्षा आम्हाला जास्त प्रतिसाद मिळत असल्याचा दावा त्यांनी केला. राज्यातल्या लोकसभा निवडणुका ५ टप्प्यात घेण्यावरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. सत्ताधारी पक्षाला अधिकाधिक ठिकाणी प्रचाराची संधी मिळावी म्हणून जाणीवपूर्वक राज्यातली निवडणूक लांबवल्याचा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, इंडिया आघाडीची सत्ता आल्यावर राहुल गांधी प्रधानमंत्री होतील असा दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी काल लातूरमध्ये

केला. महाविकास आघाडीचे उमेदवार राज्यातल्या सर्व जागांवर विजयी होतील, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

शेतकरी अडचणीत आहे. त्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत तरीही त्याकडे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं दुर्लक्ष असल्याचा आरोप शरद पवार यांनी काल केला. इचलकरंजीतल्या प्रचारसभेत ते बोलत होते. केंद्र सरकारकडून सत्तेचा गैरवापर सुरू आहे. त्यांच्या धोरणांशी विसंगत असलेल्यांना तुरुंगात टाकलं जात असल्याचा आरोप पवार यांनी यावेळी केला. त्यासाठी त्यांनी हेमंत सोरेन आणि अरविंद केजरीवाल यांच्या अटकेचं उदाहरण दिलं. देशात हुकुमशाही येऊ द्यायची नसेल तर महाविकास आघाडीला मतदान करण्याचं आवाहन या सभेत उद्धव ठाकरे यांनी केलं. राज्यातले अनेक प्रकल्प गुजरातमध्ये गेले असा आरोपही त्यांनी केला. प्रधानमंत्री यांनी महागाईच्या मुद्द्यावरही बोलावं असा आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

गेल्या निवडणुकीत कोल्हापूरकरांनी निवडून दिलेल्या खासदारांनी बंडखोरी केली. त्यांना पाडण्यासाठी कोल्हापुरात आलो असल्याचा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल कोल्हापुरात केला. उद्योगाची परिपूर्ण वाढ होण्यासाठी नव सरकार कटीबद्ध असेल. जीएसटीच्या दशहतवादातून उद्योगांना मुक्त करु असं आश्वासन त्यांनी दिलं. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांकडे राज्य आणि केंद्र सरकार दुर्लक्ष

करतंय. आमचं सरकार त्यांना न्याय मिळवून देईल, असंही उद्धव ठाकरे म्हणाले. यावेळी श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, प्रदेश काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नथल्ला, कोल्हापूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सतेज पाटील, संभाजीराजे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिकेतल्या घोटाळ्यावरुन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केलं. कोविड काळात मृतदेहांसाठीच्या पेट्यांबाबतचा संदर्भ देत त्यांच्या घोटाळ्याची मालिका आपण काढणार असल्याचा स्पष्ट इशारा फडणवीस यांनी दिला. भारतीय जनता पक्षातर्फे मुंबईत दादर इथल्या कामगार मैदानात आयोजित मेळाव्यात काल ते बोलत होते. नरेंद्र मोदी नसते तर मुंबईत महत्त्वकांक्षी प्रकल्प आले नसते, असा दावाही त्यांनी केला. गेल्या २५ वर्षात पालिकेतल्या सत्ताधाऱ्यांनी मुंबईला काय दिले? असा सवाल त्यांनी केला. मुंबईतल्या गिरणी कामगारांना तुम्ही हद्दपार केलं, इतकंच नव्हे तर ७० हजार कोटी रुपये बँकेच्या डिपॉझिटमध्ये टाकले, पण गिरणी कामगारांना घरे देऊ शकला नाहीत, अशी टीकाही फडणवीस यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सबका साथ सबका विकास होत असून गेल्या दहा वर्षात रस्ते, महामार्ग, विमानतळ यांची संख्या दुप्पट झाली आहे, मेट्रो तसंच लोकोपयोगी योजनांमुळे देशानं विविध क्षेत्रात प्रगती साधली आहे, असं उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ काल सांगलीत म्हणाले. या निवडणुकीनंतर काँग्रेस इतिहासजमा होईल, असा दावा त्यांनी केला.

**<><><><><>**

राज्य सरकारनं महिलांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले. हे सरकार मुलगी, सून, पत्नी यांच्यात कुठलाही भेदभाव करत नाही. मात्र असा भेदभाव करणाऱ्यांना जनता धडा शिकवेल असा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल भोरमधल्या प्रचारसभेत केला. ही निवडणूक नात्यागोत्याची नसून विकासाची आहे, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं तितकं काम गेल्या ६० वर्षात झालं नव्हता असा दावा त्यांनी यावेळी केला.

**<><><><><>**

निवडणूक आयोगानं तेलंगणच्या १७ लोकसभा मतदारसंघातल्या १०६ मतदानकेंद्रांवरची मतदानाची वेळ एका तासानं वाढवली आहे. आता इथे सकाळी ७ ते संध्याकाळी ६ या वेळेत मतदान होईल. तेलंगणचे मुख्य निवडणूक आयुक्त विकास राज यांनी केलेल्या विनंतीला मान देऊन ही वेळ वाढवण्यात आली आहे. राज्यातल्या सर्व प्रमुख राजकीय पक्षांनी ही मागणी केली होती. त्यानुसार हा निर्णय झाला आहे.

**<><><><><>**

प्रख्यात पार्श्वगायिका उमा रामनन यांचं आज चेन्नईमध्ये निधन झालं . त्या ७२ वर्षाच्या होत्या. त्यांनी सुमारे तीन दशकांमध्ये ६ हजारहून अधिक संगीत मैफिलींमध्ये गायन केलं होतं. प्रशिक्षित शास्त्रीय गायिका असणाऱ्या उमा रामनन यांनी संगीत दिग्दर्शक इलियाराजा यांच्याकडे पार्श्वगायन केलं होतं .

**<><><><><>**

पॅलेस्टिन - इस्राएल संघर्षावर दोन स्वतंत्र देश हाच तोडगा आहे आणि त्यासाठी भारत वचनबद्ध आहे, असं संयुक्त राष्ट्रातल्या भारताच्या स्थायी प्रतिनिधी रुचिरा कंबोज यांनी म्हटलं आहे. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत त्या बोलत होत्या. यामुळे पॅलेस्टिनी जनता स्वतंत्र देशात सुरक्षित सीमेमध्ये मोकळेपणानं राहू शकेल, असं मत त्यांनी व्यक्त केलं. हमासनं ७ ऑक्टोबर २०२३ ला इस्राएलवर केलेल्या हल्ल्याचा त्यांनी निषेध केला. प्रत्येक देशानं कोणत्याही परिस्थितीत आंतरराष्ट्रीय कायदे आणि मानवतेशी निगडित कायद्याचा सन्मान राखला पाहिजे, असं प्रतिपादन त्यांनी केलं. गाझामधल्या ओलीसांची बिनशर्त सुटका करण्याच्या भारताच्या मागणीचा त्यांनी पुनरुच्चार केला. संयुक्त राष्ट्रांमध्ये पूर्ण सदस्य होण्याची पॅलेस्टिनची इच्छा लवकरच फलद्रूप होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

ब्रिटनमध्ये बेकायदेशीररित्या राहणाऱ्या लोकांना रवांडामध्ये पाठवण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. त्यासाठी बेकायदेशीर स्थलांतरितांना आजपासून ताब्यात घ्यायला सुरुवात झाली. ब्रिटीश संसदेनं गेल्या महिन्याच्या सुरुवातीला अवैध स्थलांतरितांना हद्दपार करण्याची परवानगी देणारा कायदा संमत केला होता. यूके इमिग्रेशन कायद्याचा भंग करून बेकायदा वास्तव्य करणाऱ्या स्थलांतरितांना पुढील नऊ ते अकरा आठवड्यांत रवांडात पाठवलं जाईल.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना होणार आहे. हा सामना हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल. काल झालेल्या सामन्यात पंजाब किंग्जनं चेन्नई सुपर किंग्जचा ७ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना चेन्नई सुपर किंग्जनं २० षटकात ७ गडी बाद १६२ धावा केल्या. चेन्नई सुपर किंग्जकडून ऋतुराज गायकवाडनं सर्वाधिक ६२ धावा केल्या. पंजाब किंग्जनं १७ षटक ५ चेंडूत ३ गडी गमावून लक्ष्य गाठलं. पंजाब किंग्जकडून जॉनी बेअरस्टोनं सर्वाधिक ४६ धावा केल्या.

<><><><><>

भारतीय बुद्धिबळपटु वैशाली रमेश बाबू हिला, आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघानं 'ग्रँडमास्टर' हा सन्मान प्रदान केला आहे. या उल्लेखनीय

कामगिरीमुळे कोनेरू हंपी आणि हरिका द्रोणवल्ली यांच्यानंतर वैशाली तिसरी भारतीय महिला ग्रँडमास्टर बनली आहे.

वैशाली आणि तिचा भाऊ रमेशबाबू प्रज्ञानंद ही दोघं जगातली पहिली ग्रँडमास्टर भाऊ-बहीण जोडी बनली आहे.

**//<><><><><>//**